chapter-5

# प्रकरण - 5

# दृष्टिकोन आणि फलित

## अ) बडोदे येथील प्रबोधन प्रक्रियेचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप

इ.स. 1818 साली स्थापन झालेल्या ब्रिटिश राजवटीने भारतीय संस्कृती आणि ब्रिटिशांची पाश्चात्य संस्कृती यांच्यात संघर्ष, अनुकरण आणि समन्वय अशा अवस्था एकाच वेळी सुरू झाल्या आणि त्यातूनच महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक पातळीवर प्रबोधनाची प्रक्रिया सुरू झाली. भाषा हे साहित्याचे माध्यम असल्यामुळे साहित्य व समाज यांचे संबंध अन्योन्याश्रयी असतात.

या संदर्भात महारााष्ट्रातील प्रबोधन परंपरेचा विचार करताना बहुतांशी वेळा पुणे व मुंबई, येथील वैचारिक चळवळी, व्यक्ती व संस्था यांच्या केंद्रवर्ती संदर्भात विचार केला जातो. भिन्न भिन्न प्रादेशिक संदर्भात, भिन्न भिन्न वर्गीय पातळीवर अस्तित्वात असलेल्या मराठी भाषिक समाजात प्रबोधनाची ही प्रक्रिया घडत होती. तिची फारशी दखल घेतली जात नाही. भिन्न भिन्न वर्गीय पातळ्यांवर आणि प्रादेशिक पातळ्यांवर पसरलेल्या व्यापक मराठी भाषिक समाजात घडलेल्या प्रबोधनाचे आपले आकलन समग्रतेने होणारे नाही. 'निबंधमाला', 'सुधारक', 'केसरी' या वृत्तपत्रांच्या कर्तृत्वाचा परामर्श ज्या वेळी घेतला जात होता त्यावेळी 'दीनबंधू' चे प्रबोधन प्रक्रियेत महत्त्वाचे कार्य आहे, हे सुद्धा लक्षात घ्यायला हवे. त्यामुळेच ''मालोत्तर काळातील सांस्कृतिक घडामोडींचा विचार करताना पुणे, मुंबई येथे जे घडत होते ते आपण लक्षात घेतो, तसेच कोल्हापूर परिसरात जे घडत होते तेही लक्षात घ्यायला हवे.''[1] असे कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या संदर्भात डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात. त्याप्रमाणेच बडोदे संस्थानचे राजे असून समाज सुधारक, विद्याप्रिय, प्रजाहितदक्ष, क्रांतदर्शी अशा श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या कार्याबद्दल म्हणता येईल.

वरील विचारावरून महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा आणि मराठी साहित्य या विषयाच्या आवाक्याची जाणवणारी संकल्पना स्पष्ट होते, तसेच आजवर मराठी वाङ्मयेतिहासाच्या संदर्भात असलेली तिची

एकदेशीयताही जाणवते. महाराष्ट्राच्या भौगोलिक विस्तारापेक्षा त्याचा सांस्कृतिक परीघ अधिक मोठा आहे. या सर्व परिघ क्षेत्रात प्रबोधन क्रिया कशा तऱ्हेने घडली ? इंग्रजी राजवटीनंतर येथील जीवनाच्या सर्व स्तरावर स्थित्यंतरे झाली काय ? निरनिराळ्या प्रादेशिक संस्कृती सान्निध्यात, इतर भाषिक प्रभावात स्थानीय वैशिष्ट्ये पचवून, स्ववैशिष्ट्ये टिकवून सक्षम राहू पाहणारे साहित्य संवेदन आणि प्रबोधन यांचा संबंध कशा स्वरूपात आला ? ह्या प्रश्नांचे भान ठेवल्यासच त्या काळचे सर्वांगीण वाङ्मयीन चित्र पुरेशा प्रमाणात स्पष्ट होईल.

19 वे शतक हे सत्तांतराचे तसेच मन्वंतराचेही शतक आहे. नवीन जाणीवा, वैचारिक संघर्ष, परंपरेला आव्हान देणारे आत्मपरिक्षणाचे श तक आहे. सयाजी महाराजांच्या 'श्री सयाजी साहित्यमाला' विषयक कार्याचा विचार करताना प्रबोधनाच्या ह्या प्रक्रियेचा संदर्भ जसा लक्षात घ्यायला हवा तसेच प्रबोधन काळातील कालिक संदर्भांना ओलांडून जात भाषा व साहित्यविषयक मूलभूत वैचारिकतेची तिच्यात असलेली झेपही लक्षात घ्यावयास हवी.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड ह्यांनी आपल्या कारकीर्दित बडोदे संस्थानात प्रबोधनाची जी उज्ज्वल परंपरा निर्माण केली, तिला भारताच्या इतिहासात तोड नाही. आधुनिक भारताच्या शिल्पकारांमध्ये इतक्या समग्र आणि सम्यक दृष्टीचा, दूरदर्शी संस्कृतिकर्मी दुसरा क्वचितच आढळेल. बडोद्याची अशी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती जी आहे, तिचा निर्माता श्रीमंत सयाजीराव महाराज हेच आहेत.

श्री सयाजी साहित्यमालेतून 1912 ते 1952 या काळात निर्माण झालेल्या मराठी पुस्तकांच्या निर्मिती काळाचा विचार केला तर हा कालखंड इंग्रजी राजवटीतील 1857 च्या बंडानंतरचा म्हणजे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा अंमल संपुष्टात येऊन राणीच्या जाहीरनाम्यानंतर भारताला वसाहतीचा दर्जा मिळाल्यानंतरचा कालखंड. हा कालखंड अनेकविध प्रक्रियांनी गतिमान असा आहे. ''1857 नंतर तर सरळच ती एक 'वसाहत' बनली. पळशीकरांच्या मते, नेटिवांचे प्रबोधन घडवून आणून त्यांना प्रगत आधुनिक राज्यकारभार करण्यासाठी सक्षम बनविण्याचे आमचे जागतिक मिशन आहे असा एकीकडे दावा करीत असतानाच, ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा व्यवहार, मुख्यतः, राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या हिंदी

लोकांना प्रबुद्ध व संघटित करून'वसाहतीचे स्वराज्य' साकार करू पाहण्याऱ्या चळवळींना मोडता घालण्याचा, त्या दडपण्याचा राहिला'' [2]

इंग्रजांच्या राजवटीमुळे भारतीय समाजजीवनात अनेक पातळ्यांवर उलथापालथ होत आधुनिकीकरणाची एक प्रक्रिया घडलेली दिसते. भारतीय जीवनात तोवर अपरिचीत असलेल्या अनेक गोष्टी इंग्रजांनी आणल्या. आक्रमक राज्यकर्त्यांच्या जीवनसरणीचा प्रभाव जीत प्रजेवर पडणे स्वाभाविक होते. पूर्वीही भारतात बाहेरून येऊन येथेच स्थायिक होऊन गेलेल्या अनेक परक्या वांशिक-धार्मिक, भाषिक समूहांच्या बाबतीत अशा तऱ्हेची प्रक्रिया घडलेली दिसत असली तरी, आर्यांसारख्या आक्रमक राज्यकर्त्यांचे वंशज येथील समाज व भारतीय प्रजा यांच्या बाबतीत मात्र काहिशी भिन्न प्रक्रिया घडलेली दिसते. इंग्रजांचा मूळ देश आणि भारत यांमध्ये असलेले भौगोलिक अंतर, वंश-वर्ण-धर्म भिन्नता, इहवादी जीवनसरणी, या सर्वांच्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात. दिडशे वर्ष राज्य केल्यानंतर इंग्रजांना भारत सोडून जावे लागले. इंग्रजांनी 19 व्या शतकापासून आपल्या राजवटीत सुरू केलेल्या अनेक गोष्टींचा प्रभाव आपल्यावर अपरिहार्यपणे पडत गेला. त्यातही युरोपिय ख्रिश्चन समाजाला जगातला इतर धार्मिक समाज हा मागासलेला वाटत असल्याने इंग्रजांनी जाणिवपूर्वक नव्या शिक्षण पद्धतिचा वापर करून इथल्या मागासलेल्या भारतीय प्रजेला 'सुधारण्याचा' जो प्रयत्न केला त्याचे परिणाम खोलवर झालेले दिसतात. इंग्रजानी उचललेले हे पाऊल फक्त कारकून तयार करण्याइतकेच नव्हते. अथवा इंग्रजांच्या वसाहतवादी धोरणात आर्थिक शोषण आणि राजकीय सत्ता गाजविणे या बरोबरच आपली मूल्यव्यवस्था, आपल्या प्रजेला स्विकारावयास भाग पाडणे हा विचार अधिक प्रभावी दिसतो.

राज्यकर्ते आणि रयत या नात्याने संपर्क आल्यावर भारतीय समाजात स्थित्यंतर होणे अपरिहार्य होते. ही स्तित्यंतरे होत असताना इथल्या भारतीय समाजाची मानसिकता गुंतागुतीची आणि विलक्षण होती. अनेक पंथ, धर्म, उपपंथ व जाती-जातींमध्ये वाटला गेलेला इथला मराठी समाज एकसंध नव्हता व त्यामुळे इंग्रज लोकांशी होणारी त्याची प्रतिक्रिया आणि आंतरक्रिया ही वेगवेगळ्या प्रकारची होती. दळणवळणाची साधने, मुद्रणयंत्रे, निरनिराळ्या संस्थांचे कार्य यामुळे ज्ञान सुलभ होण्यास अवसर मिळाला.

त्यामुळेच मराठी भाषिकांच्यामध्येही समकालीन जगाविषयी नवे भान निर्माण झाले. समकालीन जगात भौतिक, पातळीवर झालेल्या बदलांच्या बरोबरच मूल्यांच्या पातळीवरही बदल घडून येत होते. भौतिकआणि मूल्यात्मक पातळीवरील बदलांना प्रतिसाद देत जाणे ही या काळात आवश्यक आणि अपरिहार्य अशी गोष्ट बनली होती. मात्र ही प्रक्रिया एकासएक या स्वरूपात घडलेली दिसत नाही. नव्याचे स्वागत आणि स्वीकार, नव्या बद्दल साशंकता आणि दुरावा, पारंपारिकता आणि नवता यांच्यातील एका पक्षाचा आग्रह व त्यामधून निर्माण झालेले प्रश्न या सर्वांमधून आधुनिकतेच्या स्वीकाराअंतर्गत अनेक प्रक्रिया दिसतात. विशिष्ट जातीवर्गांना सुधारणांच्यामुळे मिळालेली आधुनिक दृष्टी, अस्मिता, तर काही ठिकाणी सुधारणांचा बाह्य; वरवरचा स्वीकार या सर्वांमधून आपल्या समाजात जीवन व्यवहारामध्ये आधुनिकीकरणाचा स्वीकार झाला असला तरी तो मूल्यांच्या पातळीवर काही प्रमाणातच दिसत होता. बुद्धिप्रामाण्यवाद आणि मानवतावादी दृष्टिकोन या मूल्यांनी आपला सर्वच जीवनव्यवहार प्रभावित झालेला होता असे म्हणता येणार नाही. पाश्चात्य इहवादी जीवन सरणीच्या प्रभावातून भारतीय संस्कृतीच्या अनेक अंगांमध्ये व घटकांमध्ये काही बदल होत असले तरी धर्म आणि कला, या क्षेत्रातील त्यांचे सुसंवादी संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न आधुकिकरणात होत असतो.

श्री सयाजी साहित्यमालेतील ग्रंथांच्या निर्मितीमागे आणि निर्मितीस्वरूपात या आधुनिक दृष्टीचा आढळ होत असला तरी ती वैशिष्ट्यपूर्ण आहे असे म्हणावे लागते. कारण ''एकोणिसाव्या शतकातील अनेक विचारवंतांनी वैज्ञानिक दृष्टिकोणाचा आणि वैज्ञानिक ज्ञान प्राप्तीचा पुरस्कार केला होता. देशाची प्रगती आणि आधुनिक विचार तसेच संस्कृतीचा विकास यांसाठी वैज्ञानिक ज्ञानाची गरज आहे, या जाणिवेतून ते विज्ञान-शिक्षणावर भर देत होते. सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याच्या विवेकनिष्ठ भूमिकेसाठी शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराची आवश्यकता आहे याची जाणीव त्यांना झाली होती. 'विज्ञाननिष्ठ मानव' निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. या कामात ब्रिटिश सरकार साह्य करील अशीही त्यांची कल्पना होती. 'शिक्षणमंडळीस सरकारातून मिळणारा पैका कमी केला' या लेखात जांभेकरांनी लिहिले आहे, ''नेटिव लोकांचा शिक्षेची जे इच्छा करतात, त्यांस ती गोष्ट वाईट वाटेल, अशी आमची खातरी आहे. जेव्हा राजा किंवा लोक

आपल्यास ज्ञानी म्हणतात, तेव्हा राज्य चालविण्याराचा धर्म आहे की प्रजामध्ये ज्ञान वाढवायाकरिता आणि त्यांची मने चांगली करायाकरिता त्याणे सर्व प्रकारे आश्रय द्यावा आणि साह्य व्हावे...'' एतद्देशीय बुद्धिजीवींनी शास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व ओळखले होते. परंतु बाळशास्त्री जांभेकर म्हणतात त्याप्रमाणे ब्रिटिश सरकारची भूमिका नव्हती. ब्रिटिश शासनाला शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारात स्वारस्य नव्हते आणि ते भारतीयांच्या शास्त्रीय ज्ञानाच्या उच्चतम अभ्यासाला उत्तेजन देत नव्हते.''[3] 'नेटिव' रयत कल्याणकारी राजा आणि वसाहती साम्राज्यवादी दृष्टी यांच्यातील मूलभूत फरक यामधून अधोरेखित होतो.

या कालखंडाची अखेर आहे ती ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीच्या विसर्जनाने, राजकीय स्वातंत्र्याने, भारताच्या फाळणीने, गांधीजींच्या निर्याणाने आणि डॉ. आंबेडकरांच्या घटना लिहिण्याच्या सर्वोच्च मानाने झालेली दिसते. श्री सयाजी साहित्यमालेच्या निर्मितीचा हा कालखंड असा वैशिष्टपूर्ण दिसतो. राष्ट्रनिष्ठा, लोककल्याणनिष्ठा यांची 'तथाकथित' राजनिष्ठेशी सांगड घालत श्री. सयाजी महाराजांनी समाजाच्या प्रगतीची जी काही कामे केली त्यात श्री सयाजी साहित्यमालेचे स्थान फार महत्त्वपूर्ण आहे.

राजकीय, सामजिक, धार्मिक बाबतीत सुधारणा करताना या देशाला आधुनिकतेकडे नेणाऱ्या सयाजी महाराजांची शिक्षण विषयक दृष्टी या सर्वांचा मूलाधार आहे हे लक्षात घ्यावे लागते. "One of the Maker's of Modern India" (by Prof. Antony Soares) असा सार्थ गौरवोद्गार त्यांच्याबद्दल काढला जातो तो त्यांच्या प्रगतिशील अशा वैचारिकतेमुळेच.

सयाजी महाराजांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन हा त्यांच्या सर्व विचारातून स्वतंत्रपणे अभ्यासता येण्यासारखा सुटा व एकेरी स्वरुपाचा नाही. त्यांचे विचार हे ग्रांथिक स्वरूपाचे असण्यापेक्षा त्यात अंतःकरणाची शुद्धता, समाजाच्या सर्व स्तराच्या उन्नयनाची तळमळ, जीवनाकडे व्यापक व उदारदृष्टीने पाहण्याची भूमिका, जगातील निरनिराळ्या मानव समाजाच्या इतिहासातून प्रेरणा घेत प्रत्यक्ष कृतिच्या रूपात परावर्तित झालेले आहे.

"He alone, by his great personality translates his vision in reality"[4] यांच्या उद्‌गारातही याच कृतिशिलतेचा विचार व्यक्त होतो. त्यामुळे तो एकाच वेळी सामाजिक सुधारणावादी

दृष्टिकोनाशी, राष्ट्रवादी विचारसरणीशी, आधुनिकतेच्या संकल्पनेशी, मूल्याधिष्ठिततेशी निगडित असून त्यात एकांगीपणा नाही. सयाजीमहाराजांच्या साहित्यविषयक दृष्टिकोनावर, भाषाविषयक विचारांवर व त्यांना अभिप्रेत असलेल्या ग्रंथनिर्मितीच्या उपक्रमावर या शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा प्रभाव आहे.

सदर प्रबंधाच्या प्रकरण-2 मध्ये सयाजी महाराजांच्या शिक्षणविषयक, साहित्यविषयक, भाषाविषयक, संस्कृतीविषयक आणि समाजविषयक दृष्टिकोनाची चर्चा केलेली आहे.

सयाजी महाराजांची सामाजिक सुधारणेविषयीची वैचारिकता याच कालखंडातील आगरकरांच्या मध्यमवर्गीय चौकटीला ओलांडणारी आहे. समाजिक सुधारणावादी आगरकरांची भूमिकाही मानवतावादी स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वत्रयींना मान्यता देणारी व द्रष्टेपणाची होती. दोघांचेही अंतिम ध्येय एकंदर भारतीय समाजाचे उन्नयन हेच असले तरी व तत्वतः ती कितीही व्यापक असली तरी प्राधान्याने मध्यमवर्गीय सुशिक्षितांच्या सुधारणावादाशी ती निगडित होती. सयाजी महाराजांच्या सामाजिक सुधारणावादाचे नाते, कुठल्याही वादाची कटुता येऊ न देणाऱ्या बहुजननिष्ठेशी आहे. म. फुले, डॉ. आंबेडकरांचा या संस्थानाशी असणारा ऋणानुबंध व आंबेडकरांना सयाजी महाराजांनी देऊ केलेली मदत या घटना या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. बडोदे सरकारने अस्पृश्यांना संस्कृत शिकविण्यासाठी पाठशाळा उघडली, सार्वजनिक देवालये. पाणवठे, कायद्याने अस्पृश्यांना खुली केली या सर्व घटनांसंबंधाने बडोदे सरकारने काढलेले हुजूर हुकुम खालील प्रमाणे अनेक आहेत.

उदा. 1 ''शिक्षणात मागासलेल्या जातीच्या लोकांतील मुलांस शिक्षणाचा लाभ व्हावा असे प्रयत्न होत असावे. राज्यातील शाळांतून अनेक प्रकारची शिष्यवृत्ति देण्यात येते त्या वृत्यांपैकी काही वृत्त्या अंत्यज विद्यार्थ्यांकरिता राखून ठेवाव्या'' [5] (हुजूर हुकूम, B/8/28/10/18)

उदा. 2 ''मात्र काळीपरजच्या शाळा करिता काळीपरजचे शिक्षक ठेवण्याचे कारण नाही. इतर वर्गांचेही शिक्षक तेथे गेलेच पाहिजेत.''

उदा. 3 ''सरकारी तसेच स्थानिक संस्थेच्या सर्व जाहिर क्षेत्रात अंत्यज उच्च वर्णांच्या हिंदुंसारखेच येऊ शकतात आणि सरकारी विहिरी, तलाव, पाणवठे या सर्वांचा वापर करण्याचा हक्क उच्च वर्णातील

हिंदुसारखा त्यांना आहे. या संबंधी ज्या कोणाही कडून विघ्न घालण्यात येईल त्यांच्या समोर सरकारी कार्यवाही केली जाईल.'' [6] (Huzur Hukum order No 33 dated 23.3.1907)

ज्या आधुनिकत्वाकडे समकालीन समाजाला गतिशील करावयाचे आहे त्यासाठी सामाजिक सुधारणा या पायाभूत मानल्या पाहिजेत याची एक स्पष्ट कल्पना महाराजांच्या विचारात आहे. भारतीय विमोचनाच्या संदर्भात आधी राजकीय सुधारणा की सामाजिक हा वाद तत्कालीन समाजात प्रखर बनला असताना, ''बाबा वाक्यं प्रमाणम्'' ही वृत्ती धार्मिक बाबतीत अंगामध्ये खिळलेली असली म्हणजे राजकीय बाबतीत सुद्धा समाजामध्ये नवचैतन्य निर्माण होणार नाही. यासाठी प्रत्येक गोष्ट युक्तिवादाच्या कसोटीवर लावून पाहण्याची प्रवृत्ती समाजामध्ये उत्पन्न केली पाहिजे.'' [7] असे ते म्हणतात. तेव्हा राजकीय काय किंवा सामाजिक काय जीवनाच्या ह्या साऱ्याच बाजू परस्परसापेक्ष असल्याने कार्यकारण भावाची संगती लावण्याची वृत्ती निर्माण झाल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रात नवविचार निर्माण होणार नाहीत याची जाणीव त्यांच्या मनात असते आणि विद्या म्हणजे''जिने कार्यकारणाचा योग्य संबंध कळतो , सामाजिक, धार्मिक व औद्योगिक स्थिती व आपली दुरवस्था कळून ती अशी का झाली याची कारणे शोधून काढता येतात आणि सर्व विषयांचा न्यायाने व समतेने विचार करण्याची अंगी पात्रता येते. तीच खरी विद्या.'' ही विद्येची संकल्पना ही त्यांच्या या विचारांशी सुसंगतच आहे. [8]

सामाजिक सुधारणांच्या द्वारे समाजाला आधुनिकत्वाकडे नेत असतांना 'Education is the basis of all reforms and is the only way of solution from our present conditions.' या विचाराने त्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्याला अग्रक्रम दिला. [9]

चातुर्वर्ण्यव्यवस्था, जात, वर्ण, कृषिपद्धती, वतनवाडी, ग्रामसंस्था यांनी बांधलेल्या बहुजन समाजाला प्रबोधनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेत आधुनिक जीवनसन्मुख करताना सयाजी महाराजांच्या दृष्टीत संश्लेषणशीलता आढळते. जीवन कलहात पाश्चात्यांच्या पुढे पौर्वात्यांचा टिकाव लागण्याची आशा नाही अशा तऱ्हेचा न्यूनगंड वसाहतवादाने निर्माण होत असता, त्याचा निरास करताना, इतिहासदिकांचे दाखले देत, निसर्गाची परिवर्तनशीलता सांगत सयाजी महाराज गेल्या तीनशे वर्षातच बेकननंतर युरोपियनांची

प्रगती झाली, ती राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनाची सशास्त्र व्यवस्था केल्याने असे सांगतात; I can conceive of no loftier mission for India than this, to teach Philosophy to the West and learn its Science, impart purity of life to Europe and attain to her loftier political ideal, inculcate spirituality to the American mind and imbibe the business ways of its merchants. [10] यासाठी त्यांनी निवडलेला मार्ग खालील विचारातून व्यक्त होतो. "जुनी परिस्थिती बदलत आहे आणि जसा आपला देश नव्या आणि संकीर्ण स्वरूपाच्या आधुनिक जीवनात प्रवेश करील, त्याप्रमाणे नव्या सामाजिक आणि वैयक्तिक नीतीची उद्घोषणा करणे आवश्यक आहे. जीवन हे सत्य आहे, मायिक नाही चांगले आहे पापमय नाही. उपनिषदातील मर्म ओळखून ते आधुनिक गरजांना लावून दाखविले पाहिजे. सध्या आपणाला अशा सुधारकांची जरुरी आहे की जो मध्यमवर्ग प्रकाशित करील. हा मध्यममार्ग खालील तत्त्वांमधला असेल.

1. संशयवाद आणि अंधश्रद्धा
2. धर्मप्रवणता आणि पाखंड
3. परलोकवाद आणि पाखंड
4. रुक्षपद्धतीचा धर्म आणि क्रांतिकारक असा अधर्म
5. पारलौकिक आकांक्षा अशा अर्थाने माया आणि आयुष्याची अयथार्थता दर्शविणारी माया

"आधुनिक भारतीय समाजाला परंपरा आणि आधुनिकता, देशीपणा आणि आंतरराष्ट्रीयता, धर्म आणि विज्ञान, ऐहिक आणि पारमार्थिक अशा अनेक द्विध्रुवात्मक क्षेत्रात समतोल स्थापित करावयाचा आहे, या जाणिवेने सयाजी महाराजांची जीवनदृष्टी घडली आहे. सयाजी महाराजांचा सामाजिक सुधारणाविषयक विचार, शैक्षणिक दृष्टिकोन आणि मूळ भारतीय संस्कृतीवर पाश्चात्य विद्या व ज्ञानाचा संकर आणि समन्वय करुन ती अधिक विकासोन्मुख बनविणारी सृजनशील क्रान्तदर्शी दृष्टी यांच्या परिप्रेक्ष्यातून सयाजी महाराजांचा मराठी भाषा व साहित्यविषयक विचार घडलेला दिसतो." [11] हा त्यांचा विचार या संदर्भात मननीय असा आहे.

## आ) देशीवादी दृष्टिकोनानुसार सयाजी साहित्यमालेचा विचार :

सयाजी महाराजांच्या या विचार आणि कृती मागे आपल्या देशीव्यवस्थांचे आधुनिकीकरण करण्याची प्रेरणा होती असे दिसते. परंपरागत विचारमूल्ये आणि संस्था यांची चिकित्सा करुन प्रगतीच्या आड येणारे विचार, मूल्ये व संस्था यांचा त्याग करणे व मानवी विकासास पोषक घटकांचा आजच्या नवीन संदर्भात परिपोष करणे हे आधुनिकतेचे वैशिष्ट्य होय. देशी आधुनिकता आपल्या भारतीय संदर्भात नव्या विचारांचा परिपोष करीत रहाते. खरे म्हणजे आधुनिकता हे कोणत्याही समाजाच्या देशाच्या इतिहासाचे संस्कृतिसापेक्ष रुप असते. बाहेरून आलेले सर्व प्रभाव आपल्या व्यवस्थांमध्ये रुपांतरित करुन त्याचे आत्मसातीकरण संस्कृतीमध्ये असलेल्या अंगभूत शक्तिमुळे केले जाते. ब्रिटिश वसाहतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये पाश्चिमात्य संस्कृतीच्या मूल्यांचे रोपण करणे यावर अधिक भर दिला गेला होता. त्यांचा प्रतिवाद व प्रतिकार करीत भारतीय संदर्भातील देशी आधुनिकतेचे एक रूप महात्मा गांधींच्या विचारातही आपल्याला पहावयास मिळते.

सयाजी महाराजांच्या विचारात व कृतीत त्यांच्या उदारमतवादी प्रेरणेत या देशीवादी भूमिकेतून आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची बीजरूपे दिसतात. देशीवाद ही संकल्पना भालचंद्र नेमाडे यांनी मराठी साहित्यविचारात पहिल्यांदा मांडली. भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या समीक्षा लेखनाच्या सुरूवातीच्या काळापासूनच देशी-देशीपणा-देशीयात इ. शब्द वापरलेले आढळतात. पण अगदी 1979 पर्यंत देशीवाद ही संज्ञा वापरली नव्हती. त्यानंतर 1983 साली ही संकल्पना अधिक स्पष्ट मांडलेली दिसते.

1983 नंतर नेमाडे यांनी लिहिलेल्या लेखात म्हणजे 'साहित्यातील देशीयता' या निबंधामध्ये त्यांनी देशीपणा-देशीवाद आणि देशीयता या संकल्पना मांडल्या. एखाद्या लेखकाच्या कलाकृतीची समीक्षा करताना नेमाडे यांना त्या लेखकाच्या कलाकृतीतील देशीयतेचा शोध घेणे महत्त्वाचे वाटते. ''जेव्हा एखाद्या संस्कृतीचे अस्तित्व दुसऱ्या प्रबळ संस्कृतीच्या आक्रमक दडपणामुळे धोक्यात येते, तेव्हा दडपलेल्या समाजात देशीयतेची जाणीव निरनिराळ्या स्वरूपांमध्ये उद्‌भवते हे लिंटनने सिद्ध केले आहे. एकोणिसाव्या शतकात भारतीयांची अशी स्थिती होती, त्यामुळे एकामागून एक देशीवादी चळवळी निर्माण होत गेल्या

1857 चे बंड, ठिकठिकाणचे देशभरचे उठाव, शेतकऱ्यांचे बंड, त्याचबरोबर जमशेदजी टाटा, जोतीराव फुले इत्यादी अनेक देशीवादी पुढाऱ्यांनी राजकारणापासून तर भाषाशुद्धीपर्यंत ज्या अनेक देशीवादी चळवळी उभ्या केल्या, त्या सर्वांच्या पायाशी देशी संरचनांचे भान व्यक्त करणे हेच सूत्र दिसून येते. ह्यातले शेवटचे दैदीप्यमान उदाहरण म्हणजे महात्मा गांधींचा अहिंसावादी स्वातंत्र्यलढा. सारांश, देशीवाद केवळ एकाच समूहापुरता विभक्त स्वरूपात पाहाता येत नाही, कारण एक सांस्कृतिक घटना होण्यासाठी देशीवादाला आपल्या प्रदेशाबाहेरील अन्य संस्कृतींच्या अस्तित्वाची जाणीव असावीच लागते. देशीपणाच्या स्वयंपूर्णतेचे देशीवाद हे बाह्यवर्ती रूप आहे, कारण देशीवादाला असे दबाव आणणाऱ्या परसंस्कृतीचे संदर्भ लागू होतात. देशीपणाला मात्र स्वतःपुरतेच संदर्भ असतात.'' [12] देशीयता हा केवळ एक वाङ्मयीन सिद्धांत नसून देशीयता हा एक दृष्टिकोन आहे. साहित्यप्रमाणेच सामाजिक, संस्कृतिक, राजकीय, आर्थिक व्यवहारातही हा दृष्टिकोन हा महत्त्वाचा आहे. देशी नसलेल्या परकीय भाषांचे संस्कृतीचे आणि मूल्यांचे जेव्हा एतद्देशीय भाषांवर व संस्कृतीवर आक्रमण होते तेव्हा स्वतःच्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना देशीवादी व्हावे लागते.परकीय प्रभाव आत्मसात करण्याची देशीकरणाची प्रक्रिया, आपली स्वतःची प्रमाणके टिकवून ठेवणे आणि निर्माण करणे, वसाहतवादाला विरोध, विकेन्द्रीकरणाच्या तत्त्वांना प्राधान्य, बहुजन समाजाची विशिष्ट जाती-जमातीची आणि प्रदेशाची मूल्ये, सौंदर्यकल्पना केंद्रस्थानी येणे याप्रमाणे देशीवादी भूमिका ही बहुजन संस्कृती आणि त्या संस्कृतीने निर्माण केलेली मूल्यव्यवस्था यांना केन्द्रस्थानी मानणारी आहे. एका अर्थाने प्रत्येक संस्कृतीचे मूल्य मानणारी ही एक सांस्कृतिक सापेक्षतावादी भूमिका आहे. ही सापेक्षतावादी भूमिका देशीवादाच्या मुळाशी असल्याने एकाच सांस्कृतिक समूहाचे वर्चस्व लादू पाहणाऱ्या भूमिकेला देशीवादात निनिराळ्या सांस्कृतिक समूहांनी केलेल्या देवाण-घेवाणीस विरोध असतो असे नाही. ती एक स्वाभाविक प्रक्रिया म्हणून मान्य केली जाते परंतु समान पातळीवरून होणाऱ्या अशा परस्पर विनिमयाऐवजी आपली प्रमाणके आणि मूल्ये इतरांच्यावर लादण्याचा जेव्हा प्रयत्न केला जातो तेव्हा अशा अधिसत्तावादाला विरोध केला जातो. त्यामुळेच देशीवाद हा केवळ पाश्चात्याच्या वसाहतवादाला विरोध करतो असेच नाही तर बहुजन संस्कृतिला दाबून आपले सांस्कृतिक आणि जातीय वर्चस्व निर्माण करणाऱ्या एतद्देशीय भूमिकेलाही विरोध करतो. गणेश देवी यांनीही 'आफ्टर ॲम्नेशीया' आणि 'ऑफ़मेनी हिरोज' या पुस्तकातून संस्कृती स्मृतीभ्रंशा नंतर देशीवादी इतिहासाची मांडणी आवश्यक ठरविली आहे.

भाषा हा माणसाचा सर्वात मोठा आणि संपन्न वारसा आहे. खरे पहाता ज्ञान प्राप्त करण्यासाठी मातृभाषा हेच सर्वोत्तम साधन आणि माध्यम आहे असा निर्वाळा सर्वच भाषाशास्त्रज्ञांनी निःसंदिग्धपणे दिला आहे. आपल्याला विश्वाचे आकलन होते ते भाषेमुळे. आपल्या भाषेच्या वारशाचे जबरदस्त भान असणे आणि मातृभाषेशिवाय केवळ परक्या भाषेत आधुनिक होऊ पहाणे हे एक गैरलागू गोष्ट आहे याची अत्यंत प्रखर जाणीव सयाजी महाराजांच्या ठायी असलेली दिसून येते. ''भाषेत जर चांगले ग्रंथ निपजले नाहीत, तर लोकशिक्षणाचे सर्व प्रयत्न लंगडे पडतात, इतकेच नव्हे तर चांगली पुस्तके समाजास न मिळाल्याने लोकांची प्रवृत्ती सदोष पुस्तके वाचण्याकडे होते. मनुष्यामध्ये तृषा उत्पन्न करावी आणि ती भागविण्याचे साधन देऊ नये तशातला हा प्रकार आहे. देशीभाषात चांगले ग्रंथ तयार करण्यासंबंधाने माझे प्रयत्न फार वर्षांपासून चालू आहेत; हे आपणास महशूर आहेच. अनेक प्रकारे उत्तेजन देऊन व पुष्कळ खर्च करून मी या दिशेने होईल तितका प्रयत्न करीत आलो आहे.'' [13]

केवळ ग्रंथप्रसारच नव्हे तर ''देशी भाषांचे  म्हणजे देशी भाषेतून सर्व शिक्षण देणारे असे एक महाविद्यालय असावे असे प्रयत्न सयाजी महाराजांचे कारकिर्दीत कै. राजा सर टी. माधवराव यांच्या वेळेस झाले होते. परंतु ती योजना पुढे नेटास लावून रंगरूपास आली नाही'' याचे कारण ''देशी भाषा'' बोलणारे काहीच लोक उच्च शिक्षणापर्यंत पोहचतात तेव्हां त्यांचे अध्ययन व अध्यापन राजमान्य जी इंग्रजी भाषा तिंच्याद्वारे चाललेले असते.यात आहे अशी माहिती कै. दत्तो वामन पोतदार यांनी सांगितली आहे.'' [14] देशी भाषेतून लोकशिक्षण, ग्रंथालये व ग्रंथप्रसार यांच्या बरोबरच मराठी भाषेच्या उन्नतीसाठी महाराजांचे मन सर्व पातळ्यांवर कशा तऱ्हेने विचार करत असते याचे प्रत्यंतर, ''मराठी भाषेची उन्नति व्हावी म्हणून चालू विद्यापीठांतून मराठी भाषेचा अधिकाधिक प्रवेश करविण्याचा उद्योग विद्यापीठाच्या लोक नियुक्त सभासदांनी चालू ठेवावा. '' [15] या विधानातून येतो.

श्री सयाजी साहित्यमालेच्या निर्मितीमागे देशीभाषा सक्षम करणे, तिच्यामध्ये नवे ज्ञान धारण करण्याची आणि प्रकट करण्याची क्षमता अधिकाधिक विकसित करणे, हे प्रयोजन सर्वात मूलभूत आणि प्रधान स्वरूपात दिसते. त्यानुसार  श्री सयाजी साहित्यमालेतील अनेक ग्रंथांची निर्मिती झालेली दिसते.

देशीभाषांच्या सक्षमीकरणासाठी सयाजी महाराजांनी अनेक हुजूरहुकूम काढलेले होते.

उदा. 1 ''इंग्रजी घेण्यासाठी फाजील कल नसावा, देशीभाषेत लिहिल्याने शिक्षणाची कमतरता दिसेल अशी समज ठेवू नये. पारिभाषिक शब्दांचे देशी शब्द काढावे. -(खेतीवाडी खाते- 1 dated 31.8.1917.)

उदा. 2 उपयुक्त धंद्यांचे शिक्षण मिळण्यासाठी Engineering, Architecture, Chemical, Technology वगैरेचे विषय शिकविण्यात येतात. त्याचे शिक्षण इंग्रजी भाषेत देणे आवश्यक पडते हे खरेस तथापि कला असोत किंवा साहित्य असो, एकंदर प्रकारचे शिक्षण लोकसमाजात भिनून जाणे अगत्याचे आहे. व तसे भिनून जाण्यास ते देशी भाषेत देणेच जरूर आहे. (देशी शाळा -7 dated 15. 5.1923.)

उदा. 4 It ought to be well known by these young men and others that they can not expect to give satisfaction and rise in the service unless they have good command over the vernacular or vernaculars. They must be always able to read and write and express themselves fluently in the language of the country.'' (हु. का. क. दिवाण. खा. खा. हु. हु. अंक-A-42 श. 1973.) [16]

नव्या भौतिक शास्त्रांचे सर्वसामान्य माणसाला आकलन करून देणे यासाठी त्यांनी 'यामिकप्रदिप', 'सजीवसृष्टीची उत्क्रांति', 'सुप्रजाननशास्त्र', या सारख्या वेगवेगळ्या ग्रंथांची निर्मिती करवून घेतलेली दिसते. भाषेच्या या सार्वभौमत्वाच्या जाणिवेने (गुजराती हिंदीच्या संदर्भात) व इतर भाषांतील म्हणजे यात गुजराती व हिंदीसारख्या देशीभाषा व इंग्रजीसारख्या परकीय भाषां यातील ज्ञान, विचार, संकल्पना, इतिहास स्वभाषेत आणून ते स्वभाषेत पचविण्याच्या प्रयोजनाने भाषांतरांचे कामही मोठ्या प्रमाणात झालेले आहे. जगातील निरनिराळ्या समाजाच्या इतिहासाचा व साहित्याचा सखोल अभ्यास व सांस्कृतिक सजगता यामुळे साहित्यासंबंधीच्या अनेक सूक्ष्म, बीजरूप, तलस्पर्शी विषयांचा त्यांनी विचार केलेला आढळतो. बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक मानवाला संस्कृतिसंवादासाठी भाषांतराची सदाच आवश्यकता भासली आहे. भाषांतराने येणारी जाणीवसंपन्नता मोलाची आहे. तसेच परकीय भाषेतील ज्ञान भाषांतराद्वारे देशीभाषेत

आणून तिला ज्ञान संपृक्तता देणेही आवश्यक आहे. या जाणिवेने सयाजी महाराजांनी भाषांतराच्या कार्याला आपल्या साहित्य उपक्रमात, योजनात महत्वपूर्ण स्थान दिलेले आहे. भाषांतर कार्यसंबंधी काही हुजूर हुकूम महाराजांनी काढले होते "इंग्रजी, संस्कृत, उर्दु, ए अने एवीज बीजी भाषामांना जूदा जूदा विषयोना ज्ञाननो लाभ आपणा लोकोने मळतो रहे ए हेतुथी ते ते भाषामांना सारा अने उपयोगी पुस्तकोनुं भाषांतर गुजराती के मराठी स्थानिक भाषामां करावावानुं धोरण आपणा राज्यमां शरू करेलुं छे." भाषांतर करवा माटे हाल नीचे दर्शावेला बे प्रकारना पुस्तकोनी पसंदगी करवानुं धोरण छे, 1) युरोप, आशिया विगेरे जूदा जूदा खंड तथा देशोमांना ज्ञान भंडारनो लाभ आपना लोकोने मळे एवा केवळ ज्ञान विषयक पुस्तको अने, 2) इतिहास, पदार्थविज्ञान विगेरे विषयोनी सर्व सामान्य माहिती तथा ज्ञान आपी शके एवा पुस्तको, ए बे पैकी बीजा प्रकारना पुस्तकोनुं भाषांतर बराबर थवा सरखुं होय तोज ते करावावा हाथ उपर लेवुं. नही तो पहेलाज प्रकारनां पुस्तको भाषांतर माटे हाथ उपर लेवानुं वळण राखवुं. (देशी शाळा 183/20 ता. 9-4-30) 'Macdonell's History of Sanskrit Literature' चा मराठी अनुवाद, 'Civilization of China' चे भाषांतर, 'Refounding of the German Empire' इ. चे अनुवाद श्री सयाजी साहित्यमालेतून आलेले आहेत.

सयाजी महाराजांच्या भाषाविषयक दृष्टिकोनामध्ये भूतकाळाची जाणीव अत्यंत प्रगल्भ होण्याची, तिचा संशोध, चिकित्सा आणि संचित स्वरूपातील सत्त्व शोधनाची प्रेरणाही अत्यंत प्रभावशाली दिसून येते. त्याचे कारण आधुनिक समाज घडविणाऱ्या विचारवंताला भूतकाळाचेही भान जबरदस्त असावे लागते. आपल्या भूमिवर सत्त्वाने उभे रहाण्यासाठी आपल्या परंपरेचे, इतिहासाचे, संचिताचे जागृत भान असणे आवश्यक आहे. मागे पहाणे म्हणजे मागासलेपण नसून पुढे जाण्याचा तो एक मार्ग आहे. सयाजी महाराजांच्या ठिकाणी हे भान अत्यंत प्रखर अशा स्वरूपात दिसून येते. 'मराठी रियासतीचे लेखन', 'अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्र', 'हिंदुस्तानच्या इतिहासातील गोष्टी', 'मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया', 'निरनिराळ्या देशांचे इतिहास', या सर्व ग्रंथमिर्मितीच्या उपक्रमामागे आपल्याला ऐतिहासिकतेचे भान बाळगण्याची आवश्यकता दिसून येते. भारतीय संस्कृतीच्या इतिहासात वैदिक परंपरे इतकीच अवैदिक परंपराही आपल्याला

थेट बुद्धाच्या, जैनांच्या, बसवेश्वराच्या, विचारात वावरत असलेली दिसते. 'दीघनिकायचे भाषांतर', 'जगातील विद्यमान धर्म', 'वात्स्यायनकालीन भारतीय समाज', 'बुद्धकालीन भारतीय समाज'. या सारख्या ग्रंथांच्या र्निमिती मागे ही प्रेरणा सजग असलेली दिसते.

श्री सयाजी साहित्यमालेमध्ये बहुतांशी ग्रंथांचे स्वरूप हे वैचारिक ग्रंथनिर्मितीच्या स्वरूपाचे आहे. त्यामध्ये ललित, रंजनपर, मनोविनोदनार्थ अशा तऱ्हेच्या निर्मितीला यामध्ये फारसा थारा नाही. प्रबोधनयुगाचा प्रभाव त्यामागे जसा दिसतो त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे सयाजी महाराजांची साहित्यविषयक संकल्पना ही समाज हितकारक अशा स्वरूपाची आहे. कारण ''वाङ्मय म्हणजे काय?' या प्रश्नाचे उत्तर महाराज ''..... ज्यात सत्य, सौंदर्य आणि हित यांचे अधिष्ठान आहे...'' ते, असे देतात. आपल्या असे ध्यानात येईल की काही विचारवंतांनी 'सत्यं, शिवं, सुंदरम्' हे वाङ्मयाचे ध्येय मानलेले आहे. यातील 'शिवं' चे परिवर्तन महाराजांनी 'हीत' या संकल्पनेत केलेले आहे आणि ते योग्यच आहे. कारण 'शिवत्व' ही कल्पिण्याची, चिंतण्याची गोष्ट आहे, तर 'हित' ही साधण्याची, प्रत्यक्ष आचरण्याची गोष्ट आहे. वाङ्मयविचार हा केवळ बौद्धिक विलास न राहता, त्याचे अवतरण निकोप व सर्वसमावेशक समाजरचनेच्या दृष्टीने व्हावे, असेच महाराजांच्या मनात असणार..... ब्रिटिश अंमलदारांनी हिंदुस्थानातील काही भटक्या व विमुक्त जातीजमातींना 'गुन्हेगारांच्या यादीत' टाकले होते. साहजिकच हिंदुस्थानची सामान्य प्रजा या लोकांपासून फटकून वागू लागली आणि त्या जातीजमातींनाही मग चोऱ्यामऱ्या, लूटालूट यांशिवाय पर्याय राहिला नव्हता. ही स्थिती बदलायला हवी; रानवनातून फिरत राहणारे, जगण्यासाठी गुन्हेगारी शिवाय अन्य पर्याय उपलब्ध नसणारे, हे भटके लोक आपलेच भाईबंद आहेत असा सामान्य जनतेचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा, यासाठी काही एक विधायक गोष्ट करायला हवी, म्हणून सयाजीराव महाराजांनी चिं. ना. मुजुमदारांना कादंबऱ्या लिहिण्यास उद्युक्त केले. यात महाराजांनी आपल्या प्रजेबद्दलची समत्वदृष्टी दिसते; बारगीर काय किंवा वाघेर काय, ही दैव फिरलेली आपलीच मंडळी आहेत आणि तीही मुळात गुणीच आहेत, हे सांगण्याची समाजसुधारक दृष्टिही दिसते; पण सगळ्यात महत्त्वाचे वाङ्मया संबंधीच्या महाराजांच्या 'हित-तत्त्वा' च्या धारणेचे एक स्पष्टीकरणही मिळत जाते. मुजुमदारांच्या कादंबऱ्या

पांढरपेक्षा वर्गाला उद्देशूनच लिहिलेल्या आहेत, पण त्यांत चितारलेले जीवन मात्र पांढरपेशांचे नाही. जे वाङ्मय वाचतात त्यांची जीवनविषयक दृष्टी विशाल व्हावी, त्यांच्या अंतःकरणातील सहानुभाव व्यापक व्हावा, अशाच स्वरूपाचे साहित्य मराठीत निर्माण व्हावे, असे महाराजांना वाटत होते." [17]

सयाजी साहित्यविषयक संकल्पना ही वरील विचारांनी प्रेरीत झालेली असून तिची कक्षा व्यापक स्वरूपाची आहे. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, स्त्रीशिक्षणाचा प्रसार, वारंवार अभ्यासासाठी संपूर्ण राज्यभर ग्रामपुस्तकालयांची स्थापना या सर्वांचा ते आपल्या वाङ्मयविषयक कार्यातच अंतर्भाव करतात. "वाङ्मय हे बौद्धिक व भावनात्मक असे दोन प्रकारचे असते. ज्याला युरोपात Bells-letter (बेल लेत्र) म्हणतात, त्या भावनात्मक, सौंदर्यप्रधान ललित वाङ्मयास आपण अलीकडे साहित्य हा शब्द लावीत आहां असे दिसते... मला स्वतःला वाङ्मयाच्या ललित व अललित या दोन्ही शाखांचे सारखेच अगत्य वाटते" [18] जीवनदर्शन, उद्‌बोधन आणि आनंदनिर्मिती असे प्रयोजन जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या 1920 पूर्वीच्या साहित्याच्या संकल्पनेचा संकोच पुढील काळात होत गेला. त्याची जाणीव वरील व्याख्यानात व्यक्त झालेल्या विचारांत व सयाजी महाराजांच्या साहित्यविषयक कृतीतून दिसत होती. साहित्य आणि तत्त्वज्ञान, साहित्य आणि शास्त्रे, साहित्य आणि विचार यांच्या सीमारेषा बंदिस्त करीत नेल्याने ललित वाङ्मय हे एकाच अंगाने विकासण्याची शक्यता निर्माण होते. इतकेच नव्हे तर ललित वाङ्मयाचे विचारांशी असणारे अविभाज्य नाते दुबळे होत गेल्याने साहित्याचे सामाजिक संदर्भही हळूहळू पुसट होत जातात. याची दूरगामी संवेदना सयाजी महाराजांच्या समग्र साहित्य विचारातून जाणवते, ती आजच्या मराठी साहित्य संदर्भातही चिंतनीय आहे.

साहित्य संकल्पनेचा संकोच जसा साहित्य संवर्धनास हानिकारक तसेच समाजातील विविध जीवनस्तरांचे, जाणिवांचे भान सुटल्याने विशिष्ट वर्गीय संवेदनांने एकांगी होणारे, तसेच काही वेळेला कृतक् साहित्य निर्मितीला हातभार लावणारे लेखनही.त्याचा प्रवाह अवरूद्ध करणारे आहे. इ.स. 1948 साली कुसुमावती देशपांडे म्हणतात, "आजपर्यंतचे जीवन आपल्या उच्च व मध्यम वर्गाच्या तालाने चालले असेल, उद्याचे जीवन प्रचंड अमर्याद अशा बहुजन समाजाच्या तालाने चालणार आहे, त्याच्या सोयीचे

घडविले जाणार आहे हे निश्चित.'' [19] नवभारतातील सर्व कलांनी त्यासाठी सजग राहिले पाहिजे असा इशारा त्यांच्याही आधी सयाजी महाराजांनी दिला आहे. 1950 नंतर मराठी साहित्यील संकुचितपणाविरूद्ध झालेल्या चळवळी, दलित व ग्रामीण साहित्यातील सर्वस्तरीय अंतःस्फोट इ. घटना पाहिल्या असता या विचारांची दूरवर पोहचणारी नजर जाणवते ''आपल्या वाङ्मयात विशेष कमतरता अशी दिसते की, ते विशिष्ट वर्गाने विशिष्ट वर्गासाठीच लिहिलेले आहेसे वाटते... काही लेखकांनी आपल्या लेखनात जरी इतर वर्णांच्या किंवा वर्गाच्या लोकांना घुसडण्याचा प्रयत्न केला असला तरी, ते लोक म्हणजे पांढरपेशेच इतर वर्गांची सोंगे घेऊन आल्यासारखे दिसतात...सांगण्याचे तात्पर्य इतकेच की, सर्व मराठी पुस्तके एकांगी झाली आहेत. वाङ्मयात सर्व धंद्यांच्या, सर्व वर्गांच्या, सर्व स्थळांच्या लोकांनी लिहिलेला ग्रंथसंग्रह असला तर भिन्न भिन्न वर्गाच्या आकांक्षांचे, भावनांचे, विचारांचे सुखदुःख त्यात उमटलेले दिसते. व राष्ट्राच्या ऐक्यास ते संवर्धक होते. आणि भाषेतील शब्दसंग्रह वाढतो.... संबंध तीनशे मैलांचा समुद्रकिनारा महाराष्ट्राच्या कडेला असून मच्छिमारीविषयी किंवा दर्यावदीपणा विषयी एकही मराठी पुस्तक नसावे हे आश्चर्य नव्हे काय ?'' [20]

भाषेसंबंधीची इतकी महत्त्वाची आणि मूलभूत जाणीव तत्कालीन समाजात आपल्याला दिसत नाही. श्री सयाजी साहित्यमालेत अनेक ग्रंथांचे भाषांतर एकाच वेळी हिंदी, मराठी, गुजरातीतून झालेले दिसते. या तिन्ही भाषेच्या विकासामागे, त्यांच्या शिक्षणक्रमाच्या आयोजनामागे प्रत्येक मराठी भाषिक व्यक्ती द्वैभाषिक किंवा त्रैभाषिक व्हावी हा विचार दिसतो. भाषा ही तर सर्व समाजाची आहे. अनेक जाति-जमातींची भाषिक वैशिष्ट्ये ह्यामध्ये वापरली जात नाही. हा विचार सयाजी महाराजांच्या ठिकाणी आपल्याला दिसून येतो तो त्यांच्या दूरदृष्टिचा अथवा क्रांतदृष्टीचा पुरावा म्हणता येईल.

भारतीय समाजाच्या भौगोलिकतेमध्ये आणि जाति-जातिंमध्ये भौगोलिकतेचे आणि जातीचे जे काही ताणे-बाणे आहेत त्यांच्या समाजशास्त्रीय जाणीवेमुळेच 'मुंबई इलाख्यातील जाती' या सारखे मौलिक पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेतून प्रकाशित झालेले दिसते. वेगवेगळ्या काळातील समाजाचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करण्याची प्रेरणा 'भारतीय समाजस्थिती', 'बुद्धकालीन भारतीय समाज' सारख्या पुस्तकातून दिसून येते. 'जातकातील निवडक कथा' या सारख्या पुस्तकाच्या निर्मितीमागे मौखिक

परंपरेचे जतन करण्याची जाणीव दिसून येते. बहुजन समाजाने आपल्या अनेक शतकाच्या इतिहासात पारंपारिक आणि लोककलांचा वापर करून आविष्काराच्या अनेक मौखिक शैलांचा विकास केला आहे. साहित्याच्या विकासात खरे तर मौखिक परंपरा खरोखरच पायाभूत मानावी लागते. किंबहुना आजही आपल्या देशात निम्याहून अधिक लोक निरक्षर आहे आणि मौखिकता हेच त्यांचे साधन आहे. मौखिक परंपरा या देशी परंपरेत अत्यंत मौलिक असे काम करीत असतात. कागद आणि मुद्रणानंतरच लेखनाचे राजकारण अधिक वेगाने सुरू होते. मौखिक परंपरेची ही महत्त्वाची जाणीव आणि भारतीय परंपरेतील बुद्ध परंपरेचा गाभा जपणाऱ्या 'जातकातील निवडक कथा', या सारख्या निर्मिती मागे ही जाणीव दिसून येते. लोकमानसाच्या श्रद्धा, समजुती, आचारविचार, व्रते, विधी इ च्या आकलनासाठी 'लोकिक दंतकथा' सारखे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. त्यातील उपोद्धातात अभ्यासपूर्ण चर्चा असूनही ती मानववंशशास्त्र, धर्म, समाजमानस यांच्या अभ्यासासाठी संदर्भयुक्त ठरते.

किंबहुना 'दिघनिकायच्या' केलेल्या भाषांतरामागेही सयाजी महाराजांचा काही एक भाषाविचारही आहे हे लक्षात येते. सयाजी महाराजांनी ना. गो. कालेलकरांना 'झूलब्लोक' या भाषाशास्त्रज्ञाकडे-भाषाशास्त्र शिकावयास पाठवले होते. तेव्हा त्यांच्या ठिकाणी देशी भाषांच्या उत्पत्तिविषयीही काही एक विचार होता हे लक्षात येते. ''हल्लीच्या देशी भाषा संस्कृत पासून निघालेल्या नसून प्राकृतपासून सिद्ध झालेल्या आहेत; पाकृत भाषा संस्कृतपासून अपभ्रंश होऊन आल्या आहेत ही लौकिक समजूत चुकीची ठरू पहात आहे. प्राचीन जनसमाजाचे खरे चित्र संस्कृतपेक्षा प्राकृत ग्रंथाच्या अभ्यासानेच अधिक स्पष्ट कळून येण्यासारखे असल्याने व देशीभाषांनी प्राकृत वाङ्मयाचेच ऋण घेतले असल्याचा संभव असल्याने त्यांचा अभ्यास तरूण पिढीने हल्लीपेक्षा जास्त करावा व त्यातील जुन्या उपयुक्त ग्रंथांची प्रचलित भाषांत भाषांतरे करून त्यातील ज्ञान समंजस समाजाला उपलब्ध करून द्यावे.'' 21

सयाजी महाराजांच्या वरील विचारांतून संस्कृत, प्राकृत, देशी भाषा यांचे परस्परसंबंध आणि लोकजीवनाच्या अभ्यासासाठी, देशी परंपरेच्या आकलनासाठी, प्राकृत ग्रंथांचा अभ्यास करण्याच्या गरजेची ही जाणीव आजही तितकीच महत्त्वाची आहे. आपला वारसा, आपला भूतकाळ यांच्या आकलनाखेरीज आधुनिक होणे पुरेसे नाही याची स्पष्ट जाणीव सयाजी महाराजांच्या वरील विचारातून दिसून येते.

श्री सयाजीसाहित्यमालेत 'धर्म आणि नीति' विषयावर विज्ञान, इतिहास, शिक्षण, यांच्या इतकीच पुस्तके लिहिली गेलेली दिसतात. त्यातील अनेक पुस्तके ही सयाजी महाराजांच्या आज्ञेवरून लिहून घेण्यात आली आहेत. असे स्पष्ट उल्लेख आहे. 'नीतिशास्त्र प्रबोध', 'जगातील विद्यमान धर्म, बौद्धधर्म अर्थात् धम्मचिकित्सा, 'प्राच्य आणि पाश्चात्य नीतिध्येये', 'धर्म-उद्‌गम आणि विकास', 'पाश्चात्य तत्वज्ञान', ही सर्व पुस्तके सयाजी महाराजांच्या आज्ञेवरून लिहून घेण्यात आली आहे. मनुष्याच्या सर्वांगिण उन्नतिसाठी वैज्ञानिक प्रगतीइतकीच धर्मभावना, आणि नीतिसंस्कार हे महत्त्वाचे ठरतात. धर्माच्या मूलतत्त्वांची चर्चा सर्वस्तरापर्यंत पोहचल्यास व्यक्तीला धर्माची खरी ओळख होते, त्यातील कालबाह्यता, कालसापेक्षता आणि कालातीतता यांची जाणीव होते, "ज्याप्रमाणे अरण्यात प्रथमच पुढचा मार्ग आखायचा असला म्हणजे त्याच दिशेला असलेल्या मागच्या टेकड्यांकडे नजर टाकून पुढचे धोरण बांधावे लागते, त्याप्रमाणे आज संक्रमणावस्थेत असलेली बौद्धजनता व सर्वसाधारण विद्वद्वर्ग या दोघांनीही बौद्ध तत्त्वज्ञानाच्या उगमाशी असलेल्या विचारसरणीचे चिकित्सापूर्वक संशोधन केले तर त्याच्या योगाने आधुनिक विकासवादाला चालना मिळून त्यात जिवंतपणाचा जोम आल्यावाचून रहाणार नाही."[22]

भूतकालीन परंपरांतील कालातीत चैतन्य नव्या युगातही कसे नवे चैतन्य, युगमानसाशी संवादी आणि विकासमय नाते धारण करू शकते, हा विचार या सारख्या अनेक धर्मविषयक ग्रंथातून ध्वनित होतो. धर्म आणि नीती या विषयावरील ग्रंथात अनेक ठिकाणी तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केल्याची ही मराठीतील सुरूवात म्हणता येणे शक्य आहे.

धर्मभावनेचे परिवर्तन कोणकोणत्या काळात कशा प्रकारे होते याचे ज्ञान होते यामुळे धर्म विषयावर ही पुस्तके लिहून घेण्यात आलेली असावीत असे म्हणता येते. समाजामध्ये चारित्र्यसंपन्नता निर्माण होण्यासाठी नीतिविचार अगदी सुरूवातीपासून रूजविण्याबाबत सयाजी महाराजांची दृष्टी अत्यंत स्पष्ट अशी आहे. त्या संबंधात काढलेल्या एका हुजूर हुकुमा अन्वये "बडोदे कॉलेजातील तत्त्वज्ञानाचे प्रोफेसरचे जागी नेमलेले प्रो. विजरी यांनी नीतिशास्त्र व तत्संबंधी विषयांवर देशी भाषेत लहान लहान पुस्तके तयार करून प्रसिद्ध करण्याचा हुकूम देण्यात आला होता, त्याचे कारण असे की, जनसमाजाची नीति सुधारावी आणि तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र

या विषयांची गोडी व्यवहारिक रीतीने जनसमूहांत वाढावी म्हणून अशी जितकी जास्ती पुस्तके लोकांच्या वाचनात येतील तितके चांगले''[23] वरील पुस्तकांच्या निर्मितीमधून आणि त्याच्या स्वरूपावरून यामधील अनेक पुस्तके आजही धर्माच्या अभ्यासकांना महत्त्वाची आहेत असे म्हणता येते.

सयाजी साहित्यमालेतील ग्रंथांची नुसती विषयवार तपासणी केली तरी त्या मध्ये मानवी समाज जीवनाच्या बहुसंख्य अंगांचा विचार केलेला दिसतो. इतिहास, धर्म, शिक्षण, तत्त्वज्ञान, भौतिक प्रगती, आध्यात्मिकता, ज्ञान क्षेत्रातील जुने संचित आणि त्यात प्रगतीमुळे पडत गेलेली भर, मानवी कला, यांच्या विषयीचा विशिष्ट दृष्टिकोनातून विचार केलेला दिसतो. मानवी समाज जीवनाच्या मूलभूत अंगांच्या बरोबरच भारतीय समाज त्याची तत्कालीन अवस्था, त्याच्या इतिहासाचा शोध, वर्तमान जीवनातील निकड, दृष्टिक्षेपात येणारे स्वातंत्र्य आणि त्या स्वातंत्र्यामधून येणाऱ्या लोकशाहीकरणासाठी असणारी सुबुद्ध नागरीकाची गरज (जबाबदार राज्यपद्धती, शिस्त, सुधारणा आणि प्रगती, पार्लमेन्टचा इतिहास आणि घटना पद्धती) यांचाही विचार केलेला दिसतो. श्री सयाजी साहित्यमालेतील ग्रंथांच्या लेखकांत अनेक मान्यवर, विद्वद्जन, संशोधक आणि सखोल अभ्यासक यांचा सहभाग दिसतो. दाजी नागेश आपटे, ना. गो. कालेलकर, यांच्यासारखे भाषाशास्त्रज्ञ, गो. स. सरदेसाई, वि. स. वाकसकरांसारखे इतिहासकार आणि संशोधक चिं. वि. जोशींसारखे पाली-अर्धमागधी भाषेचे तज्ज्ञ, चि. वै. राजवाडे यांसारखे विद्वज्जन, न. चि. केळकर, कर्नल ना शिंद्यांसारखे अधिकारी, वाङ्मयेतिहासकार ग. रं. दंडवते, कृ. पां. कुलकर्णी यांसारखे तज्ज्ञ, सूचीशास्त्रज्ञ य. रा. दाते, वि. पां. दांडेकरांसारखे प्रोफेसर, ज. र. आजगांवकरांसारखे चरित्रकार इ. नी केलेल्या लेखनातून ज्ञानवृद्धीचे हे कार्य पार पडलेले दिसते. ''जन्मदात्याप्रमाणेंच पालनकर्ता व विद्यादाता हे पिते होत. आजपर्यंत प्रजेचे यथान्याय पालन करून संपादिलेला पितृत्वाचा मान प्रस्तुतच्या विद्यादानाने महाराजांनी दृढतर व द्विगुणित केला आहे. महाराष्ट्र ग्रंथ संग्रहात अनेक चांगल्या पुस्तकांची भर घालून, आम्हां इतर महाराष्ट्रीयांसही त्यांनी कायमचे ऋणी करून ठेविले आहे.'' [24]

सयाजी साहित्यमालेसारख्या अनेक ग्रंथलेखन विषयक योजना राबवून सयाजी महाराजांनी ग्रंथनिर्मिती करवून घेतली. उदा. 'दक्षिणाफंड' (धर्मशास्त्रावरील पुस्तकांचे भाषांतर), 'शास्त्रीय ग्रंथमाला', 'क्रीडा

ग्रंथमाला', 'पाकशास्त्र ग्रंथमाला', याशिवाय 'महाराष्ट्र ग्रंथमाला', 'जमनाबाई स्मारक ग्रंथमाला', 'सयाजी बालज्ञानमाला' इ. अनेक माला महाराजांच्या राजवटीत प्रसिद्ध झाल्या. ग्रंथविषयक योजनांबरोबरच शब्दकोशांना साहाय्य व पुरस्कार, सरकारी खर्चाने ग्रंथ छपाई करवून छपाई खर्चाइतक्या प्रती विकत घेणे, देणग्या देणे यांसारख्या अनेक उपायांचा अवलंब करीत ग्रंथप्रसार हे त्यांनी आपले आद्य कर्तव्य मानले आणि देशी भाषेला अधिकाधिक पुष्ट करीत नेणे, तिचा वापर आणि वावर समाजाच्या सर्व स्तरात वाढवणे, नव्या कालमानानुसार तिच्यातील संधारणता वर्धित करणे हे त्यांनी आपले आद्य कर्तव्य मानले.

महाराजांच्या साहित्य विषयक अथक् परिश्रमातून जी साहित्य निर्मिती झाली तिच्या बद्दल महाराज फारसे समाधानी नसावेत असे वाटते. भाषांतर, रूपांतर व स्वतंत्र साहित्यमिर्मितीतून जे विचारधन हाती येत होते त्याने प्रेरित होऊन फारसे लेखन, त्याकाळी झालेले दिसत नाही. ''हा प्रयत्न सिद्धीस न जाण्याची कारणे काहीही असोत, परंतु लोकांनी थोडा बहुत तरी स्वार्थत्याग करून या कामात भाग घेतल्याशिवाय नुसत्या एकांगी सहकारी प्रयत्नाने हे कार्य सिद्धीस जाईल असे मला वाटत नाही. पृथ्वीवर जे चिरकालीन योग्यतेचे उत्कृष्ट विद्यमान ग्रंथ आहेत, ते द्रव्याच्या क्षुद्र लोभाने निर्माण झाले नाहीत. हे मी आपणास सांगावेसे नाही.'' [25]

ग्रंथनिर्मितीच्या मागील या परप्रेरित प्रेरणा ते ललित असो अथवा ललितेतर, ग्रंथकर्त्याच्या आत्मनिष्ठेचा भाग बनतील तेव्हाच त्याला मौलिकतेचा स्पर्श होतो. सयाजी ग्रंथमालेतील काही ग्रंथात आपल्याला काही त्रुटी अथवा दोष दाखविता येणे शक्य आहे. 'राज्यनीतिशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथाच्या परिक्षणास वा. ना. गोडबोले यांनी म्हटल्याप्रमाणे,

''आयर्लंड, इटली वगैरे शब्द लिहिण्याची तऱ्हा पाहून आपण एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास आहों की काय, अशी शंका येते. पुस्तकांत पुष्कळ ठिकाणी अवरणानंतर ग्रंथकाराचे नांवच दिलेले नाही व कांही ठिकाणी नांव दिलेले असतां अवतरण ज्यांतून घेतलें त्या पुस्तकाचें नांव नाही, हे ठीक नाही. छापण्यांत अशुद्धें इतकी आहेत की, प्रुफे कोणी पाहिली होती किंवा नाही याविषयी संदेह उत्पन्न होतो; 'दृश्य', 'अनुशंगिक', हे शब्द नमुन्यादाखल देतो. कांही शब्दासंबंधाने सूचना करणे अवश्य

वाटते. Rierarchical याला 'विषमपदस्थ' शब्द वापरला आहे. परंतु 'उच्च नीच' हा शब्द अधिक अर्थपूर्ण व कमी बोजड आहे. Federal चे भाषांतर 'संधिसंश्लिष्ट' या शब्दाने केले आहे परंतु तो शब्द बरोबर दिसत नाही. अस्तु. हे दोष बाजूला केले असतां हे पुस्तक अवश्य संग्राह्य आहे या विषयी मतभेद होणार नाही. [26]

या सारख्या शब्दांच्या आणि छपाईच्या अनावस्थेइतकेच संयोजनाचे, त्या पुस्तकाचे स्वरूप सूचित करणाऱ्या उणीवाही (त्रुटी) या ग्रंथात दिसून येतात. ना. गो. चापेकर यांनी पुस्तकातील आशयासंबंधीच्या काही चुका दाखविताना, वरील बाबींवर नेमके बोट ठेवले आहे. ते म्हणतात, 'इंद्रधनुष्य – साहित्यसमीक्षण', ''पण या साडेदहा ओळींच्या उपोद्घातावरून बडोदेंसरकारच्या विद्याख्यात्यांत विवेकी अधिकारी कोणी नसावे असे वाटे. प्रथम या उपोद्घाताला जाहिरात हा प्रतिशब्द या खात्याला कोणी सुचविला हे समजत नाही. इंग्रजी ''नोटीस'' हे भाषांतर असावे. तसेच श्रीमंत सयाजीराव महाराजांना पतितपावन हे विशेषण योजण्यांत या पुस्तकाला इन्द्रधनुष्य हे नांव देण्यांत जितकें औचित्य आहे त्याच्या शतांशहि नाही. साहित्याची वृद्धि करणारा पतितपावन कसा होतो ? अज्ञान अशा गरीब लोकांत ज्ञानाचा फैलाव करूं पाहाणाऱ्याला सुद्धां पतितपावन म्हणणे योग्य होणार नाही. शब्द अर्थनिष्पत्तीकरतां योजावयाचे कीं, दिवाणखान्यांतील हंड्याझुंबरांप्रमाणे शोभेकरतां ? आणखी हे अधिकारी काय म्हणतात पहा. ''आम्ही हे पुस्तक रा. रा. दाजी नागेश आपटे यांजकडून तयार करविले''. आतां या पुस्तकांतील निरनिराळे लेख निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळ्या कारणांनी रा. आपटे यांनी प्रसिद्ध केले होते. मग या विद्याधिकाऱ्यांनी 'स्वतंत्र लेखसंग्रहात्मक पुस्तक' रा. आपटे यांजकडून तयार करविलें म्हणजे काय केले ते त्यांचे त्यांनाच ठाऊक ? तसेंच हे 'स्वतंत्र लेख संग्रहात्मक पुस्तक' भाषांतरखाखेकडून प्रसिद्ध झाले आहे ! [27]

ग्रंथनिर्मितीच्या या तांत्रिक चुकांबरोबरच त्याच्या अंतरंगासंबंधीही काही मतभेद नोंदविण्यात आले आहेत. उदा. सुरेश म. डोळके यांना 'मराठी साहित्याची रुपरेखा' हा ग्रंथ ''या ग्रंथाला 'जंत्री' किंवा फारतर 'संकलन' म्हणता येईल, 'इतिहास' म्हणता येणार नाही आणि हे संकलन करीत असतानाहि डॉ.

दांडेकरांनी उपलब्ध संशोधनाचा जितका साक्षेपानं उपयोग करुन घ्यायला पाहिजे होता तितका करून घेतला नाही.'' [28] अर्थातच अशा त्रुटी लक्षात घेताही त्याने झालेल्या कार्याची मौलिकता उणावत नाही. कारण सर्व निर्मितीची प्रक्रिया ही अत्यंत सूक्ष्म असल्याने तिचे दृश्यरूपातील परिणाम हे तत्काळ स्वरूपात दिसण्याऐवजी ते अधिक दीर्घकालीन असे असतात.

कवी माधव जूलियन, कवी दत्त, कवी चंद्रशेखर, कवी यशवंत, वि. द. घाटे, विनोबा भावे, चिं. वि. जोशी, ना. गो. कालेलकर, पु. आ. चित्रे, दिलीप चित्रे, गो. पु. देशपांडे, माधव आचवल या सारख्या अनेकांचे कर्तृत्त्व सयाजी महाराजांनी नांगरलेल्या भूमीतून तरारून आलेले दिसते. या विषयी दिलीप चित्रे यांचे मत हे एक प्रकारे प्रतिनिधिक म्हणता येईल असे आहे. ते म्हणतात, ''माझ्या वैयक्तिक जडणघडणीचा विचार केला तर माझ्या कुटंबातला उदारमतवादी बुद्धिवादी वातावरणाइतकेच श्रेय मी सयाजीरावांनी बडोद्यात निर्माण केलेल्या प्रबोधनाच्या चैतन्याला देऊ लागतो. [29]

श्री सयाजी साहित्यमालेचे कार्य त्यामुळेच अनेक स्तरावर महत्त्वाचे ठरते. आपापल्या भूमी परिसराचे सत्व राखीत बाह्य आणि अंतर्गत व्यवस्थेतील वसाहतवादी प्रभाव बाजूला करत त्याचे आधुनिकिकरण करू पाहणाऱ्या विचारांची बीजरूप प्रेरणा आणि तिची फलिते त्यात दिसतात. भालचंद्र नेमाडे यांनी म्हटल्याप्रमाणे, ''ही प्रेरणा आंतरराष्ट्रीय होण्याची फोल स्वप्ने बाळगणारी नव्हती, तर आपापल्या परिसराचे आधुनिकीकरण करणारी होती; 100 वर्षांपूर्वी सक्तीचे प्राथमिक शिक्षण करणारी, देशी लोकशाही जपणाऱ्या ग्रामपंचायतींचे 1904 साली पुनरूज्जीवन करणारी होती. खेडोपाडी फिरती ग्रंथालये, आपल्या कलांचा अभ्यास, परभाषा शिकून मराठीत भाषांतरे, आपल्या जुन्या ग्रंथांची संपादने, प्रकाशने ह्या सगळ्या गोष्टी आपला वारसा, आपली भूतकाळची जाणीव खोल करून आपल्या देशी व्यवस्था इतरांच्या बरोबरीने कार्यक्षम होतील, ह्यासाठी होती. तेच मार्ग आज पुन्हा आपल्याला आदर्श ठरणार आहेत.'' [30]

इ. स. 1912-1952 या कालखंडात निर्माण झालेल्या श्री सयाजी साहित्मालेतून 1952 नंतर मराठी ग्रंथ निर्माण झालेले नाहीत प्रकाशन संख्यांची वाढलेली संख्या, मराठी भाषेला असलेला राजाश्रय संस्थान विलीनीकरणानंतर संपणे, शासकीय पातळीवरील वितरणाचे प्रश्न, मराठी भाषिकांच्या शिक्षण

आणि ज्ञानाचे बदललेले माध्यम, सरकारी धोरणात होणारे बदल इ. अनेक कारणे या मागे असण्याची शक्यता आहे. प्रत्यक्ष ग्रंथनिर्मितीचे कार्य संपुष्टात आलेले असले तरी, श्री सयाजी साहित्यमालेतील ग्रंथनिर्मितीच्या कार्यामधून जे भाषाविषयक वातावरण निर्माण झालेले होते, त्या भाषिक पर्यावरणाचे परिणाम तत्कालीन आणि दीर्घकालीन स्वरूपाचे आहेत, असे म्हणता येते.

''बलाढ्य परकीय संस्कृतीच्या अतिशय जोरदार अशा आक्रमणामुळे एखाद्या संस्कृतीचे अस्तित्व धोक्यात येते, तेव्हा दडपलेल्या समाजात देशीवादाची जाणीव निरनिराळ्या स्वरूपात प्रकट होताना दिसते. तिच्या अतिरेकाने एखाद्या समाजाला संकुचितपणाही येण्याची शक्यता असते. अशा आत्मकेंद्रिततेतून संकुचितपणातून होऊ पाहणाऱ्या ऱ्हासापासून बचाव करत जीवनव्यवहारात सक्षम होण्यासाठी परसंस्कृतीच्या संपर्कात राहून नवनवे ज्ञान देशी संस्कृतीत रूजविण्याची क्रिया इंग्रजी राजवटीनंतर सुरू झाली सयाजी महाराजांच्या भाषाविषयक विचारात, कृतीत व व्यवहारात आपल्याला जाणीव होते ती या स्वरूपाची आहे. जागकिकीकरणाने, व्यापारीकरणाने आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या अत्यंत प्रगत अशा संस्कृती सर्व माध्यमातून आपल्यावर, विशेषत:देशीभाषांवर आक्रमण करीत असता या प्रक्रियेला सामोरे जात आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्णत्व टिकवून ठेवणे हे एक आव्हान आहे. महाराजांचे विचार व भाषाविषयक सर्व कृती पुन्हा एकदा आपल्याला नव्याने चिंतनास प्रवृत्त करतील व करोत.'' [31]

या सारख्या वरील विचारात श्री सयाजी साहित्यमालेचे फलितच प्रकट होते असे म्हणता येईल.

✪ ✪ ✪ ✪ ✪

# संदर्भ टीपा (प्रकरण-5)


1. सदा कऱ्हाडे, अर्वाचीन मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, 1981, पृ.क्र. 78.
2. वसंत पळशीकर, उद्धृत, वसंत आ. डहाके, मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, 2005, पृ. क्र. 103.
3. वसंत आ. डहाके, मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, 2005, पृ क्र. 104.
4. सर जगदीशचंद्र बोस, सयाजी गौरवग्रंथ 1933, पृ. क्र. 33
5. शाळा खाते - B/8-28-10-18, हुजूर हुकूमातील सामान्य धोरणांचे अपूर्ण व अनन्तिम टाचण (खंड-२) July 1917-1923.
6. Huzur Order No. 33 dated 27-3-1907 passed on Vernacular Education Dept. Tippan No. 217 dated 3-3-1927 Pub. Vidhyadhikari Kacheri, Govt. Press 1929.
7. भगवंत बळवंत पाळेकर, सयाजी गौरवग्रंथ, 1933, पृ.क्र. 47,
8. भगवंत बळवंत पाळेकर, सयाजी गौरवग्रंथ, 1933, पृ.क्र. 2, भा. 5
9. Speeches & Addressesof His Highness Sayaji Rao III Vol-1, 1927, Page 69
10. Speeches & Addresses of His Highness Sayaji Rao III Vol-I, 1927, Pa. 217
11. सुषमा करोगल, आमची श्रीवाणी, 2000, पृ.क्र. 123
12. भालचंद्र नेमाडे , टीका स्वयंवर, इ.स. 1990, पृ.क्र. 89
13. सं. व प्र. य. गो. जोशी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ. क्र. 46
14. द. वा. पोतदार, सयाजी गौरवग्रंथ, 1933, पृ.क्र. 184.
15. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (द्वि.खं) 1936, पृ.क्र. 327

16. हुजूर हुकूमातील सामान्य धोरणांचे अपूर्ण व अनन्तिम टाचण खंड-2, July 1917-1923
17. सं. गणेश अग्निहोत्री, दत्तात्रेय पुंडे, सयाजी नगरीतील साहित्यविचार खं. 1, 2001, पृ.क्र. 38, 39
18. सं. गणेश अग्निहोत्री, दत्तात्रेय पुंडे, सयाजी नगरीतील साहित्यविचार खं. 1, 2001, पृ.क्र. 37
19. कुसुमावती देशपांडे, पासंग, 1954, पृ.क्र. 12, 13
20. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्री मन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (प्र.खं) 1936, पृ.क्र. 325
21. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्री मन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (प्र.खं) 1936, पृ.क्र. 318, 319
22. राजाराम नारायण पाटकर, बौद्धधर्म अर्थात धम्मचिकित्सा, 1932, पृ.क्र. 208
23. शाळा खाते 39/10-11-17 हुजूर हुकूम
24. विविधज्ञानविस्तार, पु. 33 अंक 8-9, सन 1902
25. सं. व प्र. य. गो. जोशी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ. क्र. 46
26. वा. ना. गोडबोले, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष चौथे, 1931 पृ.क्र. 222
27. ना. गो. चापेकर, साहित्य समीक्षण, पृ.क्र. 258-271
28. सुरेश म. डोळके, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पृ.क्र. 42
29. सं. गणेश अग्निहोत्री, दत्तात्रेय पुंडे, सयाजी नगरीतील साहित्यविचार खं. 2, 2001, पृ.क्र. 413
30. सं. गणेश अग्निहोत्री, दत्तात्रेय पुंडे, सयाजी नगरीतील साहित्यविचार खं. 2, 2001, पृ.क्र. 426
31. सुषमा करोगल, आमची श्रीवाणी, 2000, पृ.क्र. 131